# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार
यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,
जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र. ३४३/२०२३ दिनांक ०५/१०/२०२३

**औरंगाबाद येथे एक्साईड कंपनीच्या बॅटरी असलेला कंटेनर प्रवासादरम्यान अपहार करणाऱ्या गुन्हयातील आरोपीस रु. १४,४१,२१०/- किंमतीच्या मालासह अटक. वालीव पोलीस ठाणेच्या गुन्हे प्रकटिकरण शाखेला यश**

वालीव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक ०२.१०.२०२३ रोजी गुप्त बातमीदाराकडुन एक इसम बोयदा पाडा नाका ते राजीवली गाव बाजुकडे जाणारे रोडवरील राजप्रभा इंडस्ट्रिजसमोर एक रिक्षावाला त्याच्या रिक्षातुन चोरीच्या बऱ्याच बॅटऱ्या विक्रीकरीता येणार असल्याची माहीती मिळाली होती. सदर माहीतीची शहानिशा करुन कायदेशिर कारवाई करण्याबाबत मा. प्रभारी अधिकारी, वालीव पोलीस ठाणे यांनी गुन्हे प्रकटीकरण शाखेचे स.पो.नि. सचिन सानप व पथकास आदेश दिले. त्यानुसार गुन्हे प्रकटीकरण पथकाने गुप्त बामतीदाराच्या मदतीने आरोपी नामे नवीन सुरज कामटी, वय २९ वर्षे, धंदा- चालक,रा. मु. रेंज ऑफिस, गणेश वरखंडे बंगल्यामागे, वसई पुर्व, जि. पालघर, मुळगाव मु. कुसराही शिपोल, पो. गोरखा, ता. घनश्यामपुर, जि. दरभंगा राज्य : बिहार यास सापळा रचुन शिताफीने त्याच्याकडील रिक्षासह ताब्यात घेतले. त्याचे रिक्षामध्ये एक्साईड कंपनीच्या ०९ नविन बॅटरी मिळुन आल्याने त्याच्याकडे अधिक तपास करता एक्साईड कंपनीच्या एकुण १५४५ बॅटरी असा एकुण रु. १४,४१,२१०/- किंमतीचा माल मिळुन आल्याने वालीव पोलीस ठाणे येथे अदखलपात्र गु.र.क्र. २२६६/२०२३ कलम १२४ महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. सदर माल कोठुन चोरी झाला आहे याबाबत माहीती घेता **शिवुर पोलीस ठाणे, औरंगाबाद ग्रामीण येथे गु.र.क्र. २४४/२०२३ कलम ४०६ भा.दं.वि.** अन्वये गुन्हा दाखल असल्याची माहीती प्राप्त झाली आहे.

वरील कामगीरी श्रीमती पोंणिमा श्रींगी - चौगुले, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ - २, श्री. विनायक नरळे, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग, वालीव पोलीस ठाणे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जयराज रणवरे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. सैय्यद जिलानी यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटिकरण अधिकारी स.पो.नि. सचिन सानप,

पो.ह. मुकेश पवार, मनोज मोरे, सचिन दोरकर, सतीश गांगुर्डे, बाळु कुटे, पो.शि. विनायक राऊत, अभिजीत गढरी यांनी यशस्वीरित्या केली आहे.

